(१५)

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील प्रवेश शुल्क मनोरंजनाच्या सुविधांचे व प्रभात फेरीसाठीचे दर सुधारीत करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन,**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : डब्ल्यूएलपी १०-११/प्र.क्र.१४४/फ-१.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०३ डिसेंबर, २०११.

**वाचा :-** १. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, डब्ल्यूएलपी १०-२०००/प्र.क्र.६२/फ-१, दिनांक ३१.०८.२००० व दिनांक १७.०५.२००४.
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, डब्ल्यूएलपी १०-११/प्र.क्र.१४४/फ-१, दिनांक १७.०६.२०११.
३. मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे पत्र क्रमांक : कक्ष-७/संकीर्ण/४७५/सन २०११-१२, दिनांक ०३.०८.२०११.

**प्रस्तावना :-**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानतील प्रवेश शुल्क व मनोरंजनाच्या सुविधांद्वारे प्राप्त होणाऱ्या निधी हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात येतो. सदर निधीतून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची देखरेखीची कामे रोजदारी मजूरांकडून करुन घेण्यात येतात. रोजंदारी मजूरांच्या वेतनात वाढ झाल्यामुळे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानतील प्रवेश शुल्क व मनोरंजनाच्या सुविधांद्वारे प्राप्त होणाऱ्या निधीमधून संजय गांधी राष्ट्री उद्यानाच्या देखरेखी व व्यवस्थापनाची कामे योग्यरित्या करणे अवघड होत असल्याने संदर्भ क्रमांक (२) येथील शासन निर्णयान्वये सदर दरात वाढ करण्यात आली आहे.

तथापि, सदर दरवाढीमुळे लोकप्रतिनिधी तसेच जनसामान्यांनी विरोध व्यक्त केला आहे. त्यांच्या भावनांचा विचार करता, संदर्भ क्रमांक (२) येथील शासन निर्णयान्वये करण्यात आलेली दरवाढ सुधारीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेतील विवेचनाच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १७.०६.२०११ अन्वये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील प्रवेश शुल्क मनोरंजनाच्या सुविधांचे दर व प्रभात फेरीसाठीच्या दरात करण्यात आलेल्या दरवाढीत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास तसेच सदर सुधारीत दरात प्रती वर्ष १० टक्के वाढ करण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे. सदर सुधारीत दरात प्रती वर्ष १० टक्के वाढ करण्याचे अधिकार मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई यांना या शासन निर्णयाव्दारे प्रदान करण्यात येत आहेत.

- ज्येष्ठ नागरीकांसाठी वयोमर्यादा ही ६५ वर्षावरुन ६० वर्षे अशी करण्यात येत आहे.
- ६५ वर्षापेक्षा वयस्कर ज्येष्ठ नागरीकांना फिरण्यास वेळेची मर्यादा राहणार नाही.
- दिनांक १७.०६.२०११ च्या शासन निर्णयातील सुधारित दरवाढीच्या तक्त्यात अनुक्रमांक (७) येथे प्रभात फेरीकरीता ज्येष्ठ नागरीकांसाठी दर्शविण्यात आलेला वार्षिक दर रुपये १२/- हा नगण्य आहे. तसेच सदर दरामध्ये ९ वर्षानंतर वाढ केली असल्याने सदर दर कायम ठेवण्यात येत आहे.

- पर्यटक कुटूंब (पती, पत्नी व २ मुले) यासाठी रुपये ४६०/- इतका खर्च येत असून त्याऐवजी खालीलप्रमाणे २ पॅकेजेस् देण्यात येतील :-
  - **(अ) रूपये ३००/- :-** उद्यानातील मनोरंजनाच्या सर्व सुविधा म्हणजे मुख्य प्रवेशव्दार फी, हलके वाहन प्रवेश, वनराणी, नौका विहार, व्याघ्र विहार/सिंह विहार व कान्हेरी गुंफा. सदर पॅकेजचा (मनोरंजनाच्या सुविधाचा) फायदा हा त्याच दिवशी निश्चित करण्यात आलेल्या वेळेत देण्यात येईल. सदर फी ही मुख्य प्रवेशव्दार येथेच वसूल करण्यात येईल.
  - **(ब) रूपये २२५/- :-** उद्यानातील मनोरंजनाच्या सर्व सुविधांपैकी कोणत्याही दोन सुविधा मुख्य प्रवेशव्दार फी व हलके वाहन प्रवेशासह. सदर सव लत त्याच दिवशी विहित केलेल्या वेळेसाठी असेल. सदर फी ही मुख्य प्रवेशव्दार येथेच वसूल करण्यात येईल.
- ज्येष्ठ नागरीक तसेच गृहिणींची प्रभात फेरीची वेळ सकाळी ५.०० ते ७.३० ऐवजी सकाळी ५.०० ते ८.०० अशी करण्यात यावी.

सदर सुधारीत दरवाढ दिनांक ०१ जानेवारी, २०१२ रोजी पासून लागु करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.३००/२०११/व्यय-१०, दिनांक १८.११.२०११ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( विजय सूर्यवंशी )**
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वने), मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.
कार्यासन व्यय-१०, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ (निवडनस्ती).

---------